श्लोकाचे विवेचन केले. ग्रंथात स्वामींनी 'युद्ध' ह्या शब्दाचा अर्थ आपापले धार्मिक कर्तव्यकर्म असा व्यापक केला आहे म्हणून तो अर्थ चिंतनीय आहे. आणि लढणे' ह्या शब्दाचा अर्थही प्रयत्न करीत असता अगदी निकराच्या स्थितीपर्यंत जाणे असा केला आहे. इ. स. १९०८–९ च्या धामधुमीच्या काळात स्वामींच्या 'एक श्लोकी गीता' ह्या ग्रंथात सरकारला राजद्रोहाचा वास आला त्यामुळे स्वामींना तीन महिने कारागृहवास पत्करावा लागला होता. तो त्यांनी नुसत्या फलाहारावर सहन केला.

'गीतासिंधुतरंग' हा स्वामींचा भगवद्गीतेवरील दुसरा ग्रंथ. गीतेच्या अभ्यासकांना हा ग्रंथ उपयुक्त ठरणारा आहे.

'योगपरामर्श' ह्या पुस्तिकेत योगसूत्रांचे सार सामान्य वाचकांच्या दृष्टीने स्वामींनी काढलेले आहे.

स्वामींचा 'चांगदेवांचा कोरा कागद' हा ग्रंथ ज्ञानदेवांच्या 'चांगदेव पासष्टी' ह्या ग्रंथाचे विवरण करणारा आहे. आनंद वाढेल अशा भाषेत ह्या ग्रंथाची कौशल्याने रचना केली आहे.

'माझा पारमार्थिक दैवयोग अथवा ईश्वरीय ऋणानुबंध' ह्या ग्रंथात स्वामींचे वैयक्तिक चरित्र असून ते त्यांच्या अंतरंगावर प्रकाश टाकणारे आहे. ह्यात अध्यात्ममार्गात त्यांना जे अनुभव आले ते निवेदन केले आहेत ह्या ग्रंथाच्या प्रास्ताविकात स्वामी लिहितात, "घडलेली किंवा निदान दिसलेली भासलेली वस्तुस्थितीरूप ही इत्थंभूत हकीगत अगदीच बोलू नये असे नाही. ती आम्ही आमच्या विवक्षित श्रोत्यांपाशी बोललो आहो इतके असले म्हणजे झाले. आम्ही या पुस्तकाच्या अवघ्या तीनशेच प्रती काढल्या आहेत यावरून हे स्पष्ट होईल" ह्या स्वामींनी केलेल्या स्पष्टीकरणावरून अध्यात्मिक अनुभव उघडपणे बोलू नयेत ह्या संकेताचे निराकरण होईल.

स्वामींचा मुद्रीत ग्रंथसंभार पुढीलप्रमाणे आहे :—

(१) अकिंचन कांचन अथवा पतितपावन, पुणे; इ. स. १९१० (ह्या ग्रंथात स्वरूपतत्वज्ञान ह्या विषयाचे विवेचन केले आहे.) (२) एकश्लोकी गीता (संस्कृत व मराठी); धुळे; इ. स. १९०९ (अध्याय ८ मधील 'तस्मात्सर्वेषु कालेषु' ह्या श्लोकांचे गद्यात्मक विवरण संस्कृत कारिकांसह) (३) गीतासिंधुतरंग अथवा भगवद्गीतेसंबंधी काही विचार; पुणे; शके १८३९ (४) गुरुप्रसाद, पुणे; इ. स. १९०४ (तत्वप्रत्यायन किंवा तत्वपरिचायक नाम प्रकरण, (संस्कृत व मराठी), (५) चांगदेवांचा कोरा कागद; इ. स. १९१७ (६) प्रणव–प्रकाश; १ ली आवृत्ती इ. स. १८९८; २ री आवृत्ती

इ. स. १९१० (७) माझा पारमार्थिक दैवयोग; पुणे; इ. स. १९१८. (८) योगपरामर्श; पुणे; इ. स. १९०९ (योगशात्र म्हणजे काय?) (९) विष्णुसहस्त्र नामर्थ भास्कर; पुणे; (गद्य भाषांतरासह सटीप सविवरण, अभ्यासात्मक) (१०) सिद्धामृतगीत (आध्यात्मिक कविता), (११) सुखबोध समुच्चय (ओवीबद्ध) धुळे, शके १८३१ (प्रबोधिनी, भूपाळी, सिद्धामृत गीत, तत्वगीत, स्वहित सर्वस्व)

संस्कृत : (१२) परमार्थ दर्शनम् श्लोकबद्ध; इ. स. १९०० (१३) परमेश्वर सहस्त्रनाम; श्लोकबद्ध; इ. स. १९१८.

स्वामींच्या वरील ग्रंथसंभारात भावना व विवेक आणि पांडित्य व रसिकता ह्यांचा अपूर्व संगम पाहावयास मिळतो. ● ●

## वाचकांचा पत्रव्यवहार

संपादक साईलीला यांस

कृ. सा. न. वि. वि.

"प्रत्यक्ष साई दर्शन" ही दशरथ रामजी तळेकर यांची कथा अतिशय आवडली. ही कथा वाचता वाचता मनाला "साई दर्शन" विषयी चटका लावून जाते. त्याना झालेला साईबाबांचा साक्षात्कार खरोखरच झाला आहे, असे चित्र डोळ्यापुढे उभे रहाते! आणि साईबाबांच्या दर्शनाची आंतरिक ओढ मनात उत्पन्न होते. सहाजीकच हात जोडले जातात. त्यांची कथा "उत्कृष्ट" आहे. तळेकरां सारख्या नवलेखकांकडून प्रत्येक वाचकांच्या मनात याहि पेक्षा उत्कृष्ट "साई" विषयी लिहावे असे वाटते.

कु. शोभा आळते यांची कविता आठ ओळींची असून सुद्धा आवडली तसेच इतर कथा कविता छान आहेत. "साईलीला" या मासिकाद्वारे योगीराज श्रीसद्‌गुरु साईनाथ महाराजांविषयी चमत्कार, साक्षात्कार, सामान्य जनते समोर जे मांडतात त्या सर्वांस माझे धन्यवाद !

**सुभाष अंकुश सावंत**

मु. डिगणे, ता. सावंतवाडी जि. रत्नागिरी

माननीय संपादक 'श्रीसाईलीला' यांना –

आपले मासिक फार फार उद्‌बोधक असून वरचेवर ते भक्तीरसयुक्त असे रंगत चाललेले आहे. आपल्या मासिकातील संपूर्ण मजकूर मी मासिक हातात पडताच अधाशीपणाने वाचून काढतो. 'साई डिरेक्टरी' निघावी अशी माझी अनेक दिवसांची मनिषा होती.

**पांडूरंग मारूती यादव,**

मु. पो. माळीनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

# त्रैमूर्ती श्री साई

(या लेखाला संपादक सहमत आहेत असे नाही.)

**श्री. गणपत गोविंद सामंत, एम्. ए.**

३/६९ कुडाळदेश, गौड ब्राम्हण निवास, मुं. ४

साधारण सप्टेंबर १९६० च्या सुमारास मी फारच बिकट परिस्थितीत असताना 'श्री साईसत्‌चरिताचे' विजया दशमीच्या अगोदर पारायण चालू केले व समाप्ति दसऱ्या दिवशी केली. श्रीसाईबाबांनी समाप्तिच्या दिवशी म्हणजेच दसऱ्यास स्वप्नी दर्शन द्यावे अशी सुरुवातीसच प्रार्थना केली होती पण त्या दिवशी पहाटे फारच दीर्घ स्वप्न पडले पण स्वप्नात श्रीसाईबाबांचे दर्शन न होता दुसऱ्याच सत्पुरुषाचे दर्शन होऊन संकटातून मुक्त झाल्याची ग्वाही मिळाली व त्याप्रमाणे एक महिन्याच्या आत माझा बिकट प्रश्न सुटला पण स्वप्नात दर्शन देणारा सत्पुरुष कोण हे कळले नाही. त्यानंतर १९६७ मार्चमध्ये श्रीसत्यसाईबाबांचे बेंगलोर येथे दर्शन झाले व स्वप्नी दिसलेल्या सत्पुरुषाचा उलगडा झाला. त्यानंतर निरनिराळे बरेच अनुभव आले व त्याच स्वानुभवावरून हा लेख लिहीत आहे. मी बुद्धीवादी असल्यामुळे जे ऐकले ते लिहीत नसून जे अनुभविले ते लिहित आहे म्हणूनच सर्व श्रीसाईभक्त वाचकांनी याचा पडताळा घेऊनच या लेखाचे मूल्यमापन करावे हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

श्रीसत्यसाईबाबा हा श्रीसाईबाबांचा अवतार आहे व श्रीसाईबाबांच्या जन्माचा श्रीसत्यसाईनी जो उलगडा केला आहे तोच खाली देत आहे. साईभक्त आणखी संभ्रमात पडू नयेत म्हणून श्रीसत्यसाईनी हा अवतार शतक झळकविण्यापूर्वी पूर्ण करून शेवटचा व तिसरा अवतार 'श्रीप्रेमसाई' म्हणून हरिजन कुटुंबात घेण्याचे अगोदरच घोषित केले आहे. या व अशा गोष्टींचा उहापोह विस्तारभयास्तव या लेखात देणे अयोग्य ठरेल. म्हणूनच श्रीसाईबाबांची जन्मकहाणीसच सुरूवात करीत आहे.

गोदावरी नदीच्या काठी असलेल्या पाथरी नावाच्या गावी एक धार्मिक, सात्त्विक व सनातनी ब्राम्हण दांपत्य राहत होते. ब्राम्हणाचे नाव गंगाभव व पत्नीचे नाव देवगीरम्मा असे होते. पतीप्रमाणे देवगीरम्मासुद्धा अत्यंत भाविक होती व ती सदोदित गौरीपूजनात निमग्न असे. अपत्य अभाव हेच या दांपत्याचे एकच दुःख.

हे दांपत्य सदैव पूजेअर्चेत व आराधनेत मग्न असे व अशाच एका दिवशी

डोक्याभोवती तेजोवलय असलेला अत्यंत तेजस्वी अतिथी अचानक त्यांच्याकडे उपस्थित झाला. संपूर्ण दिवस आतिथ्याचा स्वीकार करून अतिथीने सायंकाळी विचित्र मागणी केली. अतिथीने रात्री स्त्रीसहवासीक इच्छा प्रदर्शित केली. देवगीरम्मा अतिशय घाबरली व गंगाभव मोठ्या पेचात पडला. बिचारी देवगीरम्मा नतमस्तक होऊन गौरीच्या पायाशी प्रार्थना करू लागली. तेवढ्यात दारावर टकटक असा आवाज झाला व दरवाजा उघडताच अभिसारिकेप्रमाणे नटलेल्या एका स्त्रीने आत प्रवेश केला. आत आल्याबरोबर तिने अतिथीची चौकशी केली व तावडतोब ती अतिथीकडे गेली. ही स्त्री दुसरी तिसरी कोणी नसून स्वत: गौरी होती व अतिथी अन्य कोणी नसून शिव होता.

शिव-गौरी मन:पूर्वक हसली व त्यांनी त्या दांपत्यास प्रसन्न होऊन दर्शन देण्याचे ठरविले. दर्शन दिल्यानंतर दांपत्याने एक मुलगा व एक मुलगी देण्याचा वर मागितला. शिव-गौरी त्या दांपत्याच्या भक्तिने पूर्ण प्रसन्न झाली व त्यांचा वर मान्य करून स्वत: शिवानेच तिसरे अपत्य म्हणून त्यांच्या पोटी जन्म घेण्याचे आश्वासन दिले.

वरपूर्ती झाल्यानंतर देवगीरम्माला परत तिसऱ्यांदा दिवस गेले गंगाभव त्यावेळी पूर्ण ईश्वराराधनेत निमग्न होता. व त्याने अरण्यात जाण्याचा निर्णय घेतला. त्याला साथ देण्यासाठी देवगीरम्माने दिवस गेले असताना अरण्यवास पत्करला व ती अरण्यातच एका झाडाखाली प्रसूत झाली. पक्षांच्या कूजनाने वातावरण भारून गेले होते व जणू त्या बालकाचे स्वागत करीत होते. त्याच-वेळी माता-पिता तपोसाधनेने इतके भारले होते की त्यांनी बालकाला अरण्यातच निसर्गाच्या हवाली करून ते निघून गेले. त्याचसुमारास तेथून एक फकीर व त्याची पत्नी त्या मार्गाने चालली होती. त्या बालकाचे रुदन कानी पडताच फकीर दांपत्याने त्याला घेतले व त्याचे पालन केले. त्या मुलाला ते दांपत्य 'बाबा' म्हणत संबोधित.

बालक अत्यंत हुशार, तेजस्वी व सुंदर होते. एके दिवशी सर्व सवंगड्या-बरोबर खेळत असता त्याने सावकाराच्या मुलाचे सर्व गोट्या जिंकल्या. त्यावेळी 'बाबाचे' वय फक्त बारा वर्षे होते. बाबाने सावकाराच्या मुलाशी पुन्हा पैज मारली व त्याच्या सर्व गोट्या जिंकल्या. सावकाराच्या मुलाने शेवटी देव्हाऱ्यातील शीव-लिंगच उचलून आणले तेही बाबाने जिंकले व सरळ ते गिळून टाकले. सवंगड्यात खळबळ उडाली. सावकाराची पत्नी धावत आली व तिने फकिरीच्या बाबास मारण्याचा धाक घातला. बाबाने तोंड उघडले व काय आश्चर्य, सावकारणीला विष्णुच्या दहा अवतारांचे दर्शन झाले. तिने हात जोडले व रस्त्यातच 'बाबाचे' पाय धरले.

ही घटना गावात पसरली. बाबा वारंवार गिळलेले लिंग बाहेर काढून मशिदीत बसून त्याची पूजा करीत. मुसलमानांना या कृतीचा राग आला व त्यांनी फकीराला व बाबाला वाळीत टाकले. हिंदूंनी आपल्या मंदिरात बाबाला प्रवेश नाकारला. फकिराने या परिस्थितीला कंटाळून बाबाला नाईलाजाने घर सोडावयास सांगितले. बाबा एकटाच बाहेर पडला व पाण्याची पणती पेटवून लिंगाची पूजा करू लागला.

हा 'बाबा' म्हणजेच 'साईबाबा' होत हे वाचकांच्या लक्षात आले असेलच. फिरता फिरता घोड्याच्या शोधात असणाऱ्या नबाबाची व बाबांची गाठ पडली व घोड्याचा शोध लागून बाबांनी आपली किमया दाखविली व नंतर त्यांचे शिरडीस आगमन झाले व यानंतरची कथा सर्व भक्तांना माहितच आहे.

श्रीसाईबाबांच्या जन्माचे अज्ञात गूढ ते हिंदू की मुसलमान हे कोडे त्यांनीच दुसरा जन्म 'भगवान श्री सत्य साई' म्हणून दि. २३ नोव्हेंबर १९२६ रोजी पुट्टपर्थी या लहानशा पौराणिक महत्त्व असलेल्या खेड्यात घेऊन जनते-समोर जाहीर केले.

वरील माहिती 'श्री साईसुनी चरित्र' या तेलगु श्लोकांच्या व 'सत्यं शिवं सुंदरम्' या पुस्तकाचे आधारे घेतली आहे.

कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर यांनी श्रीसाईबाबांच्या आज्ञेने व आशीर्वादाने लिहिलेले 'श्रीसाई सच्चरित' हे श्रीसाईबाबा शिर्डीसंस्थान कमिटीतर्फे प्रसिद्ध झाले. गुरुचरित्र, एकनाथी भागवत या ग्रंथाच्या तोडीचा हा ग्रंथ आहे. ओव्या प्रासादिक तर आहेतच पण त्याशिवाय त्यांची गोडी अवीट आहे. या ग्रंथातील खालील ओवी पाहा

आठा वर्षांचा बाळ जनीं । प्रकट होईन मी भागुतेनी ।
ऐसे महाराज भक्तांलागुनी । आहेति सांगुनी राहिले ॥

भगवान श्री सत्यसाई हा श्रीसाईबाबांचा दुसरा अवतार आहे याची ग्वाही देणारी व दोन्ही जन्मांचा दुवा सांधणारी वरील ओवी आहे. श्रीसाईबाबा यांनी १८ ऑक्टोबर १९१८ मध्ये अवतार कार्य संपवून नोव्हेंबर १९२६ मध्ये भगवान सत्यसाईच्या रूपाने प्रकट झाले. आठ वर्षांचा बालक म्हणून नव्हे तर आठ वर्षांनी परत आपण मानवीरूप घेऊ असे आपण म्हटले होते असे भगवान श्रीसत्य साईनी उद्गार काढले व ओवीची दुरुस्ती केली. मागील जन्माचे गूढ त्यांनी उकलिले एवढेच नव्हे तर हा दुसरा अवतार ९५ वर्षांच्या सुमारास संपवून शेवटचा व तिसरा अवतार 'श्री प्रेमसाई' या नावाने म्हैसूर येथे एका हरिजन कुटुंबात घेण्याचे त्यांनी आताच घोषित केले आहे. इतक्या सहजरित्या

त्यांनी तिन्ही जन्मांची सांगड घालून पहिल्या जन्माचे गूढ उकलून व श्रीसाई-बाबा हिंदू की मुसलमान या वादाचा शेवट केला.

अंधश्रद्धा न ठेवता एक अभ्यासू भाविक म्हणून मी वरील गोष्टीची प्रचिती घेतली. याबाबतीत मला नुसता अनुभव आला असे नव्हे तर प्रत्यक्ष साक्षात्कार लाभला म्हणूनच अधिकार वाणीने मी लिहित आहे.

'श्री साई सच्चरितांतील' खालील ओव्या खरोखरच लक्षात घेण्यासारख्या आहेत. श्रीसाईबाबांचे बोल कै. दाभोलकरांनी खालीलप्रमाणे ओवीबद्ध केलेले आहेत.

आता काय आहे शिरडींत । समर्थ झाले ब्रम्हीभूत ।
ऐसी न शंका यावी मनांत । मरणातीत श्रीसाई ।।
आठा वर्षांचा बाळ जनीं । प्रकट होईन मी मागुतेनी ।
ऐसे महाराज भक्तांलागुनी । आहेति सांगुनी राहिले ।।
ऐसे बांधुनी प्रेमफांसा । वाटती महाराज गेले प्रवासा ।।
येतील मागुतेनी हा पूर्ण भरंवसा । भक्तमानसा झालासे ।
साक्षात्कार कित्येकांसी । दृष्टान्तानुभव बहुतेकांसी ।
चमत्कार तो अनेकांसी । गुप्तरूपेंसी दाविती ।।
अभाविकां गुप्त असतो । भक्तां भाविकां ठाईच दिसती ।
जैसी जयाची चित्तवृत्ति । तैसीच अनुभूती रोकडी ।।
चावडींत गुप्तरूप । मशिदीत ब्रम्हरुप ।
समाधित समाधिरूप । सुखस्वरूप सर्वत्र ।।
असो सांप्रत हाच विश्वास । भक्ती धरावा निज जीवास ।
भंग नाही समर्थसाईस । अक्षय रहिवास अखंड ।।...

एवढे सांगून बाबा तुम्हांस हमी देतात :—

झालो जरी गतप्राण । वाक्य माझे माना प्रमाण ।
माझी हाडे तुर्बतीमधून । देतील आश्वासन तुम्हांस ।।
मी काय पण माझी तुर्बत । राहील तुम्हांसवे बोलत ।
जो तीस अनन्य शरणागत । राहील डोलत तयासवे ।।

भगवान श्री सत्यसाईंचे खालील विचार वाचा :—

"एका ठराविक मर्यादेपुढे माणूस घटना घडवू शकत नाही. मग तुम्ही त्याला नशीब म्हणा किंवा दुसरे काही म्हणा. यात मुख्य गोष्ट परमेश्वराचे आधिपत्य नम्रपणे मानणे ही होय. नशीबालाच 'कर्म' म्हणतात ते तुमचे तुम्हीच घडविता व पुसूनही टाकू शकता. तुमची सद्यःस्थिती भूतकालाशी

निगडित झाली आहे, त्यामुळेच तुमचे भविष्य घडणार आहे. या जन्मात तुमचे विचार, तुमच्या भावना, पूर्वजन्मात पाहिलेल्या व अनुभवलेल्या प्रसंगावर आधारित असतात.''

श्रीसाईबाबांचे उद्गारदेखील वरील विधानास पोषक असेच आहेत.

इष्टानिष्ट सुखदुःख । संचितानुसार अमृत वा विख ।
हे प्रवाहपतित द्वंद्व देख । धरी न हरिख वा शोक ॥
होणार ते होऊ द्या यथेष्ट । सद्गुरुचिंतन आपुले अभिष्ट ।
संकल्प विकल्प होतील नष्ट । संचित अनिष्ट टळेल ॥

मनुष्य दिवसे-दिवस बुद्धिवादी होत चालला आहे पण त्याला निसर्गावर मात करता येणे शक्य नाही. अतिरेकी बुद्धिवादामुळे सुख व समाधान दूर-दूर जात आहे व याची जाणीव झाल्यामुळेच 'श्रद्धा' निर्माण होत आहे व अशाच वेळी साधुसंत दीपकल्पाप्रमाणे मार्गदर्शन करीत आहेत. श्री भगवान सत्यसाईबाबांचा जन्म अशाचवेळी झाला आहे. हा प्रत्यक्ष परमेश्वरी अवतार आहे याची प्रचिती आता लोकांस येत आहे.

श्रीसाईंच्या मागील, चालू व पुढील जन्मांची सांगड विस्तृतपणे येथे देता येणार नाही पण या लेखावरून पूर्ण कल्पना येईलच.

● ●

## लेखक-कवींसाठी सूचना

श्री साईलीलेकडे लेख-कविता इ. साहित्य पाठविताना ते चतकोर कागदास समास पाडून सुवाच्य अक्षरात लिहावे. मजकूर कागदाच्या एकाच बाजूने लिहिलेला असावा. दोन्ही बाजूने लिहू नये. कार्डावर किंवा आंतरदेशीय पत्रावर लेख-कविता लिहून पाठवू नयेत. लेखाचे विषय प्रामुख्याने भगवान साईबाबा संत व आध्यात्मिक असेच असावेत. लेखन नवीन मराठीत करावे. लेखक हे साधे नियम पाळीत नाहीत व त्यामुळे काही चांगला मजकूर नाईलाजाने परत पाठवावा लागतो व अकारण गैरसमज निर्माण होतात.

# ग्रंथभेट

(शिशिरातले गुलाब – अनुवाद – श्री. वि. वा. पत्की, प्रकाशिका – सौ. मंदाकिनी टेकाडे, मनोरंजन प्रकाशन, अभ्यंकर बिल्डिंग, स्लेटर रोड, मुंबई ४०० ००७ पृष्ठे ४६० किंमत – तीस रुपये)

भारताचे माजी सर न्यायाधिश सर मोहमदअल्ली करीमभाय छागला यांची आत्मकथा मूळ इंग्रजीत "रोझेस् इन डिसेंबर" या शिर्षकाखाली प्रकाशित झाली आहे. या आंग्ल ग्रंथाचा 'शिशिरातले गुलाब' हा सुंदर, सोप्या व चित्ताकर्षक भाषेत अनुवाद श्री. वि. वा. पत्की यांनी केला आहे. या ग्रंथात छागला साहेबांनी आपली जीवनगाथा रसाळपणे कथन केली असून ती सांगता सांगता सभोवतालच्या तत्कालीन परिस्थितीवरही प्रकाशझोत टाकलेला आहे. या हकीकती वाचता वाचता भारतातला गेला साठ वर्षांचा प्रदीर्घ व गुंतागुंतीचा कालखंड दृष्टीपुढून सरकतो. एम. सी.ची ही जीवनकथा वाचताना अनेक स्थळांचे, व्यक्तींचे, घटनांचे, मनुष्यस्वभावाचे दर्शन घडते आणि म्हणूनच की काय पुस्तक हातचे खाली ठेववत नाही. छागलांनी जगाच्या रंगभूमीवर बॅरिस्टर, न्यायाधिश, सर न्यायाधिश, राजदूत आणि सामाजिक व राजकीय कार्यकर्ते म्हणून अनेक भूमिका यशस्वी पार पाडल्या. या सर्व भूमिकांची सुरवात व अखेर या ग्रंथात वाचावयास सापडते. देशातल्या व विदेशातल्या अनेक थोरामोठ्या व्यक्तींचे विशेषही या ग्रंथात वाचावयास सापडते. भारतीय राजकारणातले रहस्य समजावून घेऊन विरोधियांशी विविध प्रकारचे डाव खेळून सरन्यायाधिश पदावरून निवृत्त होऊन आपला जीवनपट लिहिणारे महाभाग विरळाच ! तेव्हा या दृष्टीने या पुस्तकाचे महत्व विशेष आहे. भारतीय विद्याभवन तर्फे असे हे सुंदर पुस्तक मनोरंजक प्रकाशनाचे श्री. मुकुंदराव व सौ. मंदाकिनी टेकाडे यांनी प्रकाशित केले याबद्दल त्यांचे खरोखरच तोंडभरून कौतुक करावेसे वाटते. एवढ्या या मोठ्या ग्रंथाच्या कामी त्यांनी खूप कष्ट घेतले आहेत यात वाद नाही पण त्यातल्या त्यात ग्रंथात छागला साहेबांचे निदान एकतरी छायाचित्र असावयास हवे होते ही गोष्ट मनाला खटकते. पुढील आवृत्तीत हा दोष जाईल अशी अपेक्षा आहे.

–श्रीसाईनंद

# — श्रीरामनवमीचा उत्सव कार्यक्रम, —शिर्डी

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज शिर्डी यांचा श्री रामनवमी उत्सव सालाबादप्रमाणे दि. ८–४–७६ ते १०–४–७६ पर्यंत ३ दिवस साजरा झाला. मा. रिसीव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांनी सर्व खातेप्रमुखांची एक महिना अगोदर सभा घेऊन कामाचा व खर्चाचा विचार विनिमय करून कामाची योजना आखून दिल्याप्रमाणे मांडवाचे काम, पाणपोई, साफसफाई, दिवाबत्ती, लाऊडस्पीकर, कलाकारांची हजेरी, संरक्षण व्यवस्था, अन्नदान, वाजंत्री, बॅंड, चौघडा वगैरेंची व्यवस्था उत्तम प्रकारे ठेवण्यात आली होती.

उत्सवाचा पहिला दिवस : दि. ८–४–७६ गुरुवार रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. गुरुवार व उत्सव असलेमुळे साईभक्तांची श्रींच्या दर्शनासाठी फार गर्दी झाली होती. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे फोटोची व साईचरित्र ग्रंथाची मिरवणूक पहाटे मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. तेथे चांदीच्या भव्य सिंहासनावर श्रींच्या फोटोची स्थापना करून चरित्र वाचनास सुरुवात झाली. त्यानंतर इतर कार्यक्रम सुरू झाले. दुपारी ४ ते सायंकाळी ६–४५ पर्यंत ह. भ. प. अनंतराव महाराज आठवले, नांदेड यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७–३० ते ९ व ९–३० ते ११ पर्यन्त सौ. सुमतीबाई टिकेकर मुंबई यांचे गायन झाले. रात्रौ ९–१५ ते ११–३० पर्यंत श्रींची गुरुवारची चावडी झाल्यावर श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून काढण्यात आली. स्थानिक लोकांनी गारुड-भारुड कार्यक्रम केले. पुण्याचे रघुनाथ सांडभोर यांनी नकलांचे कार्यक्रम केले. कोळी मंडळी मुंबई व इतर साईभक्तांनी भजन, नाच, गायन, करून कार्यक्रमाला शोभा आणली अशा थाटात पालखी मिरवणूक गावातून चालली असता रस्त्यात ठिकठिकाणी पालखी थांबवून सुवासिनींनी ओवाळणी केली. टाळ, मृदुंग, सनई चौघडा, श्रीसाईनाथ हायस्कूल बॅंड शिर्डी व राहाता येथील बॅंड, शिरडी येथील बॅंड, ढोल वगैरे वाद्यांच्या गजरात पालखी मंदिरात आली व शेजारती झाली.

उत्सवाचा मुख्य दिवस : दि. ९–४–७६ शुक्रवार मंदिर पहाटे ५ वा. उघडले. "श्रीसाईनाथ महाराज की जय" अशा गजरात साईभक्तांनी समाधि मंदिरात प्रवेश केला. नित्य कार्यक्रम झाल्यावर श्रींच्या फोटोची व चरित्र ग्रंथ वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून समाधि मंदिरात आली.

कावडी मिरवणूक : सालाबाद प्रमाणे गावातील भाविक मंडळी कोपरगाव मुक्कामी गोदावरी नदीत रात्री १ वा. आंघोळ करून गोदावरी नदीचे पाणी ८ मैल कावडी घेऊन पायी चालत आली. सकाळी ६–३० वाजता मा. रिसीव्हर साहेब यांनी कावडीची पूजा करून स्वागत केल्यावर अंदाजे सात आठशे कावडींची भव्य मिरवणूक वाजत गाजत गावातून आली. मंदिरा-

जवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर प्रत्येकाने कावडीच्या पाण्याने बाबांच्या समाधिस स्नान घातले. हा कार्यक्रम दोन तास चालला होता. सकाळी १०–३० ते दुपारी १२–३० पर्यंत ह. भ. प. अनंतराव महाराज आठवले यांचे रामजन्म व्याख्यान कीर्तन झाले. सायंकाळी निशाणाची व रथाची मिरवणूक झाली. रात्री ८ ते दुसरे दिवशी सकाळी ६ वाजेपर्यंत कलाकरांच्या हजेऱ्या झाल्या. रात्रभर जागर झाला. कलाकारांना मानधन म्हणून १ रुपया व नारळ प्रसाद म्हणून देणेत आला. मंदिर भक्तांना दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवले होते.

उत्सवाचा तिसरा दिवस : दि. १०–४–७६ शनिवार नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त सामुदाईक अभिषेक पूजा व प्रसाद रूपाने कापड विक्री झाल्यावर ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे गोपाळकाला कीर्तन व दहीहंडी कार्यक्रम सकाळी १०–३० ते दुपारी १२–३० पर्यन्त झाला. रात्री ७–३० ते १० वाजेपर्यंत श्री. विश्वनाथ बागूल मुंबई यांचे गायन झाले. १० ते १०–३० शेजारती झाल्यावर भक्तांना तीर्थप्रसाद देणेत आला व उत्सव समाप्त झाला.

या महिन्यात काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील-प्रमाणे :–

कीर्तन :– १) श्री. ग. वि. जोशीशास्त्री, संस्थान गवई यांची कीर्तनें नेहमीप्रमाणे झाली. २) ह. भ. प. अनंत महाराज आठवले नांदेड, यांची तीन कीर्तने. ३) ह. भ. प. तुकारामबुवा आजेगांवकर परभणी, यांची दोन कीर्तने ४) ह. भ. प. छगन महाराज बारटक्के नांदेड यांचे कीर्तन ५) सौ. इंदिराबाई वि. देशपांडे, मिरज यांचे कीर्तन कार्यक्रम झाले.

प्रवचन :– ह. भ. प. निवृत्तीराव पाटील गोंदकर शिर्डी यांचे प्रवचन झाले.

भजन :– महिला भजन मंडळ शिर्डी.

१) सौ. इंदिराबाई का. पाठक, २) सौ. सुशिला भा. गुजर, ३) सौ. वत्सला व. रासने, ४) सौ. शकुंतला रा. खोल, ५) सौ. उषा प्र. मुळे, ६) सौ. चारुबाला सु. गुजराथी, ७) श्रीमती लीलावती गुजराथी, ८) श्रीमती ताई निमोणकर, ९) सौ. कमलाबाई म. गुजराथी.

गायन, वादन, भजन वगैरे :– १) श्री. शंकर ग. गुरव सांगली २) श्री. कृष्णराव रा. चोणकर, मुंबई ३) श्री दास मोटवाणी, मुंबई ४) श्रीराम वि. सातर्डेकर, मुंबई. ५) सौ. सुमतीबाई टिकेकर, मुंबई. ६) श्री. एस. जी. टिकेकर, मुंबई. ७) श्री. रमेश मोडक, मुंबई. ८) श्री व सौ. शशिकला

वैशंपायन ९) श्री. दामोदर बा. आंधर, कवठे, पंढरपूर. १०) श्री. बाबूराव अ. नरोडे, कोपरगाव. ११) श्री. आनंदराव के. आढाव, कोपरगाव. १२) श्री. रामभाऊ किटे. १३) कु. मंगला वहाडणे, कोपरगांव. १४) कु. निमा कुळकर्णी १५) श्री. शिवराम खंडागळे, १६) श्री. अशोक जंगम १७) श्री. भीमराव साहेब १८) कु. कल्पना गुजराथी. १९) कु. मोहनी वैद्य. २०) श्री. भगवंत-राव काळवाघे. २१) श्री. मुरलीधर मिस्त्री. २२) सौ. अंजली वाडेकर. २३) श्री. रघुनाथ बा. सांडभोर पुणे. २४) श्री. चांगदेवराव वाघ. २५) श्री. वसंत भावसार. २६) श्री. विलास वि. चव्हाण. २७) श्री. चंद्रकांत त्रि. माळकर २८) श्री. सुभाष कुलकर्णी. २९) श्री. अनंत द. जोशी ३०) श्री. सुरेश जंगम. ३१) श्री. दिलिपकुमार पांडे. ३२) श्री. महेशकुमार नरवडे. ३३) श्री. भोळानाथ समेळ, मुंबई. ३४) श्री. डॉ. किर्तीकर, मुंबई. ३५) श्री. रत्नाकर ना. कोराटे. शिर्डी. ३६) सौ. नीला प्रभू, मुंबई. ३७) श्री. पठाण सावळी विहीर, ३८) श्री. चंद्रशेखर गाडगीळ पुणे. ३९) श्री. वसंत पु. तोलानी, मुंबई. ४०) श्री. सदाशिवराव जाधव, सांगली. ४१) श्री. शामसुंदर भेडा, संगमनेर. ४२) श्री. मुरलीधर गायकवाड, संगमनेर. ४३) श्री. आदिनाथ तुकाराम सावळे-विहिर. ४४) सौ. शरयू मराठे शिर्डी. ४५) कु. मंगला जोशी शिर्डी. ४६) श्री. सदाशिवराव हडकर मुंबई. ४७) श्री. आर. के. भालेकर मुंबई. ४८) श्री. आर. एस. देशमुख अमरावती ४९) श्री. दत्तोबा जळगावकर शिर्डी. ५०) श्री. ज्ञानेश्वर वैद्य शिर्डी. ५१) श्री. हरीचंद्र स. जाधव मुंबई. ५२) श्री. शंकर दादू साळफर शिर्डी. ५३) श्री. मुराद गुलाबखान गणेशनगर. ५४) श्री. राघू भा. गुरव शिर्डी. ५५) श्री. इस्मालभाई टेलर. गणेश-नगर. ५६) श्री. रामचंद्र ना. कोते शिर्डी. ५७) श्री. हरीश्चंद्र रानडे, बेट कोपरगाव. ५८) श्री. प्रभाकर भा. अवचट नगर ५९) श्री. भिमराव धो. बनसोडे. ६०) श्री. नारायण राऊत, नागपूर. ६१) श्री. शेखनबाब ७. पटेल, अस्तगाव ६२) श्री. पोपटराव तुवर, पाचेगाव ६३) श्री. मधुकर दिवेकर, पिंपळगाव. ६४) श्री. दत्तात्रय काशिनाथ कोतकर सटाणा. ६५) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर, शिर्डी. ६६) श्री. रोशन रवादी मुंबई. ६७) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी. ६८) श्री. तुकाराम गो. चौधरी, निमगाव, ६९) श्री. अर्जुन बा. काकडे, चांदा. ७०) श्री. विश्वनाथराव बागुल मुंबई. ७१) श्री. सिताराम न. पवार, मुंबई. ७२) श्री. विश्वनाथ रा. पेंढारकर, मुंबई. ७३) श्री. विश्वनाथ वि. जोशी, ठाणा ७४) श्री. प्रकाश मु. रानडे, मुंबई. ७५) कै. तुकाराम खेडकर व पार्टी. श्री. पांडुरंग मुळे

मांजरवाडीकर. ७६) श्री. अरुण श्री. नवाथे, मुंबई. ७७) सौ. संगीता अ. नवाथे, मुंबई. ७८) श्री. विश्वनाथ वि. कुळकर्णी, मुंबई. ७९) श्री. एन. शिवशंकर मुंबई. ८०) सौ. शैला वि. जोशी, नासिकरोड. ८१) श्री. अनिल द. वैद्य, पुणे. ८२) श्री. डॉ. टी. एन. गजेंद्रराव व भगवान सत्यसाई भजन मंडळी तामिळनाडू.

साईनगर इमारत नंबर २ चे भूमीपूजन व लक्ष्मीनगरचे उद्‌घाटन :– मा. श्री. आण्णासाहेब शिंदे केंद्रीय कृषीराज्य मंत्री दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली व मा. श्री. बी. जे. खताळ, पाटबंधारे व कायदा विधीमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे शुभ हस्ते दि. १८–४–७६ रोजी संस्थान कर्मचारी निवासस्थान नं. २ चे भूमी पूजन व लक्ष्मीनगर घरकुलांचे उद्‌घाटन झाले. अहमदनगर जिल्ह्यातील सन्माननीय शासनाचे संस्थानच्या सहकार्याने पाहुणे व पुढारी हजर होते. मा. श्री. पारेखसाहेब सीटी सिव्हिल कोर्ट मुंबई यांचे देखरेखीखाली सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडले.

माननीयांच्या भेटी :– १) मा. श्री. अण्णासाहेब शिंदे केंद्रीय कृषी राज्य मंत्री दिल्ली. २) मा. श्री. बी. जे. खताळ, पाटबंधारे व कायदा विधीमंत्री महाराष्ट्र राज्य ३) मा. श्री. एन. के. पारेख न्यायाधीश सिटी सिव्हिल कोर्ट मुंबई ४) मा. श्री. के. एम. पाटील, सार्वजनिक आरोग्य आणि ग्राम विकास मंत्री महाराष्ट्र ५) मा. श्री. पी. सुब्रम्हण्यम जिल्हाधिकारी, पुणे. ६) मा. श्री. व्ही. सुंदरम् जिल्हाधिकारी, अहमदनगर. ८) मा. श्री. एम. जे. वर्मा कलेक्टर सेंट्रल एक्साईज पुणे. ९) मा. श्री. कॅप्टन देसाई सेक्रेटरी इरिगेशन डिपार्टमेंट महाराष्ट्र १०) मा. श्री. प्रधान इनकम टॅक्स कमिशनर पुणे. ११) मा. शिवाजीराव पाटील निवासी उप–जिल्हाधिकारी अ. नगर १२) मा. शिवाजीराव बराबकर, डी. एस. पी. अहमदनगर.

हवापाणी :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. हवेत उकाडा असून उन भरपूर पडते. तरीपण रात्रीचेवेळी वातावरणात थंडावा असतो.

## श्रीसंत गुलाबबाबा मुंबापुरीत –

● नागपूर जवळील काटोलचे महान संत सद्‌गुरु श्री गुलाबबाबा हे येत्या आषाढी एकादशी पूर्वी किंवा आषाढी एकादशीनंतर लगेच मुंबापुरीस भेट देत आहेत. मुंबापुरीत त्यांचा मुक्काम विख्यात साईभक्त डॉ. के. भ. गव्हाणकर, "इंदिरा निवास" पहिला मजला, न्यू आग्रा रोड (लाल बहादूर शास्त्री मार्ग) पोस्ट कचेरी जवळ कुर्ला. मुंबई ४०००७० येथे राहिल. दूरध्वनी क्रमांक ५५१२२५ श्री गुलाब बाबांच्या आगमनाचा इतर तपशील पुढील अंकी.

# पसायदान

दुःख-निराशेचे तिमिर जावो ।
सद्‌भक्तीचा सूर्य उगवो ।
जे जे वांछील तें तें लाहो ।
साईभक्त ॥१॥

वर्षत सकळमंगळी ।
साई-भक्तांची मांदीआळी ।
सदा शिरडी-मंडळी ।
भेटतु आम्हां भक्ता ॥२॥

किंबहुना सर्व सुखी ।
पूर्ण होऊनि या लोकी ।
सर्वां करी सुखी ।
बाबा साई ॥३॥

येथ म्हणे श्रीसाईश्वराओ ।
हा होईल दानपसावो ।
येणे वरें सदाशिव विठ्ठलो ।
सुखिया झाला ॥४॥

सदाशिव विठ्ठल गर्दे
६७ शिवाजीपार्क
दादर–२८

# साईमहती

तुझ्या लीलेने वेडी झाली
अवघी दुनिया सारी
शिर्डी नगरी अवतीर्ण जाहले
साईनाथ श्रीहरी ॥धृ॥

काय वर्णू मी साई महती
दिवे तेलाविण पेटती
असाध्य असे आजार किती
उदी देऊनि बरे करी।
शिर्डी नगरी अवतीर्ण जाहले
साईनाथ श्रीहरी ॥१॥

भावभक्तीने साई पूजती
मनोकामना होई पुरती
धन्य असे ते शिर्डीपती
जगी भजती नरनारी!
शिर्डी नगरी अवतीर्ण जाहले
साईनाथ श्रीहरी ॥२॥

–रमेश डी. चव्हाण.
साईनिकेतन, गुजरलेन
नवापूर, जि. धुळे.

# प्रणाम

शिरडी ग्रामी साधु अवलिया साई नामक कोणी
होऊनि गेला संत महात्मा, आले माझ्या कानी.
दारिद्र्याने अती गांजलो, व्याधिनेही फार.
नाही मिळाला कोणाच्याही हाताचा आधार.
निंदेचे मी लक्ष्य जाहलो, कथाहि केविलवाणी ।। शिरडी ग्रामी।।

दिधले कोणी मला वाचण्या चरित्र हे साईचे
चिंतामणि जणु मला सापडे, दुग्धामृत आईचे.
अधीर झालो केव्हा जाईन, गायिन शिर्डी कहाणी ।।शिरडी ग्रामी।।

धन्य वाटले पाहूनि मूर्ति नष्ट होता नैराश्य.
चैतन्याचा प्रकाश दिसला. काय करू मी भाग्य!
व्यथा संपली तशी आपदा, आले नयनी पाणी ।।शिरडी ग्रामी।।

श्रद्धा सबुरी मंत्र दिला हा मशिदमाईचा स्वर्ग
वैराग्याचा मला दाविला अचुक एक हा मार्ग
जन्मांतरिही आठव राहो, साई, तव मम ध्यानी ।।शिरडी ग्रामी।।

नुरला आता वेळ घडीचा वाढ एवढा भीक
राहो निश्चल मूर्ति नयनी होईल सारे ठीक
प्रणाम करितो हा शेवटचा भेट होउ दे मरणी ।। शिरडी ग्रामी।।

गं. रा. भट.
संदेश हौसिंग सोसायटी
सोनावाला रोड, गोरेगाव
(पूर्व) मुंबई ६३.

# मागणे लई नाहीं

घडेल जे जे हातूनि 'साई' –
तूच निवारावे
भले, बुरे वा असो विलक्षण –
तुलाच पावावे –१.
बुद्धी जैसी देशिल 'साई' –
तसाच वागीन मी
काया वाचा मनें करोनी –
तुलाच पूजिन मी –२.
नकोत घोडे, नकोत गाड्या –
नकोत गाद्या लोड
असोत भक्कम पाय दोन हे –
पुरे वसाया दगड –३.
झोपायाला नको शेज ती –
नकोत लाडू, पेढे
एक कांबळे पुरे झोपण्या –
मिळो भूकेला तुकडे –४.
नको मान वा सन्मान नको तो –
नको बनाया 'दादा'
राम राम तो नको कुणाचा –
नको लबाडी धंदा ५.
एक मागणे तुझा असावा –
सदा मस्तकी हात
संकट काळीं तुझी असावी –
आधाराला साथ –६.

–शंकर इनामदार.
टी. ६।१ मंडाले लाईन्स.
रेंज हिल्स, खडकी
पुणे २०. (४११०२०)

# पाऊलें वळली शिरडीला

पहाटेच्या संधीप्रकाशांत
किती चाललो नाहीं कळलें;
साईनाथांच्या मंदिरापाशीं
जेव्हां आलो तेव्हा समजलें;
उजाडले होते.
चमचमणारी सोनेरी किरणे
नाचत होती कळसावर;
पहाटेची थंडी अजून
उभी होती प्रवेश द्वारावर
किरणांनी हलकेच केला
प्रवेश गाभाऱ्यात;
भाविकांसमवे मी ही शिरलो
हळूच साईच्या मंदिरात
साईनाथांशी ओळख जहाली
खूप त्यांच्याशी बोललो;
इथे यायचे कारण पुसतां
खरे काय ते बोलूनी गेलो
दर्शन घडले आशिर्वादही मिळाला
आता काय हवे होते मजला;
घरी येऊनि मोठ्या हौसेने
सुरुवात केली कामाला
कामा मध्ये यश लाभले
बरकत आली धंद्याला;
ऋण फेडण्या साईनाथांचे
पाऊलें वळली पुन्हां शिरडीला ॥

गजानन मो. दर्णे (उरण)
मु. विनायक, पो. उरण,
जि. कुलाबा.

# श्रीसाई दरबार

(चाल) ले के पहला पहला प्यार

साई देवाचा अवतार ।
करी भक्तांचा उद्धार ।
शिर्डी नगरीत भरला हा साई दरबार ।।धृ.।।

पहिले पहिले साई आले खंडो मंदिरात ।
म्हाळसापती हृदयी पेटली हि ज्योत ।
"या साई" केला हा पुकार । त्यांना आनंद झाला फार ।। शिर्डी ।।
फिरे दारोदारी मागे माधुकरी ।
त्यात होती सारी भक्तांची तिजोरी ।
देई प्रेमाचा आधार । पाजी अमृताची धार ।।शिर्डी।।
मनोभावे ज्याने भक्ती याची केली ।
दीन दुबळ्यांचा झाला हा रे वाली ।
स्मरण करी वारंवार । वाहे त्याचा सर्व भार ।।शिर्डी।।
भक्त किती असो जवळ अथवा दूर ।
कधी नाही दिले त्यांना हे अंतर ।
बाबा अंतर्ज्ञानी फार । पहाती सारा हा प्रकार ।।शिर्डी।।
शिर्डीच्या साईचा लागेना अंत ।
पाण्यामध्ये याने पेटविली ज्योत ।
दिप ठेवले ओळीवार उडून गेला तो अंधार ।।शिर्डी।।
दत्तू म्हणे साई किती गाऊ गुण ।
तुझ्या चरणी ठेवी सदा मला लीन ।
वंदन करतो वारंवार । द्यावा बुडत्याला आधार ।।शिर्डी।।

—दत्ताराम म. मोरे.
४७० शिवाजीनगर, पुणे ५

# दीनानाथ दयाके सागर

मानवता के महा पुजारी, दीनों के दुखहारी
मना रही हैं जन्मशताब्दि प्यारी जनता सारी ॥धृ.॥
कोतेगाव के धोबी कुल में
ज्योति प्रगटी तिमिर मूल में
अमरावती में दीप जलाया सेवा का हितकारी ॥१॥
'पूर्ण' की वह धारा बहती
'डेबूजी' को प्यारी लगती
प्रकृति माँ की गोद में रमता, हर रचना मनहारी ॥२॥
बाबा न थे मूर्तिपूजक
मानवता के सच्चे सेवक
जनसेवा ही पूजा उनकी, परम धर्म सुखकारी ॥३॥
घूम घूमकर अनुभव पाया
दया धर्म का भाव जगाया
कठोर तप से सिद्ध हुईयों सेवा परोपकारी ॥४॥
बड़ा मधुर था लोक व्यवहार
रूढी खंडन मौलिक विचार
बड़े अनोखे कीर्तनकार, रम जाये संसारी ॥५॥
सबको प्रिय थे बाबा गाडगे
जनता के वे सेवक लाडले
फटे वस्त्रों में लगते जैसे सम्राट हो, भिखारी ॥६॥
वे थे निष्काम कर्मयोगी
सेवा में नित रमते जोगी
दीनानाथ दया के सागर, करुणाकर अवतारी ॥७॥
चाहे कितनी आए विपदा
फकीर की थी यही संपदा
हाथ में लकड़ी, टूटा मटका, ब्रज के थे बनवारी ॥८॥
'नर करनी' जो मानव करता
'नारायण' वह जग में बनता
सेवाधर्म का पालन करता, धन्य वह संसारी ॥९॥
धन्य धन्य यह मेरा जीवन
पाये थे बाबा के दर्शन
स्मृति खोजती बीते क्षणको, संतचरण रज न्यारी ॥१०॥

—राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' पाटकर वाडा, भगतसिंग पथ डोंबिवली (पूर्व)

57

# ध्यान साईंचे सुंदर

ध्यावे साईनाथ नाव
मनोठेवा निर्मळ भाव
यावे शिरडी रमावर
ध्यान साईचे सुंदर ॥

मुखे म्हणा 'साई साई'
नाही भेदभाव भाई
गोदावरी गंगामाई
शिरडी नांदे तिचे ठायी ॥

साई वाऱ्यात हलतो
साई झाडात डोलतो
जेथे जातो तेथे साई
माझे जग साई होई ॥

धन्य शिरडी ऐसे तीर्थ
साईसंत हे समर्थ
म्हणे दास हनुमान
माझा साई आत्माराम ॥

– हनुमान भगवान सावंत
विलेपार्ले

Regd. No. MH/BYE/26


# साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधु संतच नव्हे तर प्रत्यक्ष "रामावतारी" "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान् सच्चिदानंद सद्‌गुरु **श्रीसाईबाबा** (शिरडीचे) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील **'सोनियाचा दिन'** होय.

आजच श्रीसाईबाबांची शीलाखंडावरील पूर्णाकृती पंचधातूची (ब्रॉझ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा. मग काय रोज पूजा आरती नैवेद्य म्हणजे जणू काय **"जाहले घराचे मंगल देऊळ !"**

अशा तऱ्हेने साईभक्ताचे प्रत्येक घर हे एक लहान का होईना पण प्रत्यक्ष बाबांचे मंगल देऊळ बनावे अशी इच्छा मनी धरून आम्ही श्रीसाईबाबांची ९ इंच उंच व ५ इंच रुंद अशी पंचधातूची अत्यंत मजबूत अशी मूर्ति बनविली आहे. जिला अगदी लहान मुलांपासूनसुद्धा फारसे जपावे लागत नाही.

मूर्तीचे खास वैशिष्टय म्हणजे ती पंचधातूची व योग्य साईजची बनविल्यामुळे एक तर मूर्ति ताम्हनांत ठेवून तिला सुवासिक अत्तराने अगर पंचामृताने स्नान, अभिषेक घालता येतो. तसेच मूर्तीला डोक्यावर शिरपेंच, मुकुट इत्यादि अलंकार व फेटा अगर इतर रंगीबेरंगी पोषाखाने मूर्ति अत्यंत शोभिवंत करून आपल्याला कमालीचे मानसिक समाधान मिळते.

मूर्तीची किंमत अत्यंत वाजवी ठेवली आहे !

तसेच श्रद्धावंत भक्तांच्या काही अडचणीही आम्ही लक्षात घेऊन योग्य प्रकारे सहाय्य करू ! बाहेरगावी मूर्ति पोस्टाने अगर व्ही. पी. ने पाठवू.

"मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक डिझाईनचे लाकडी देव्हारे उपलब्ध आहेत."

अधिक माहिती वा इतर तपशिलासाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा :-

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,**
पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०,००५७
फोन नंबर : ५७ ६२ ९८. भेटण्याची वेळ : सकाळी ७ ते ९ रात्री ७ ते ९.


मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई -३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.**



दीड वीत रुंदीच्या चिंध्यांनी टांगलेल्या फळीवर श्री बाबा झोपत.

# अनुक्रमणिका—जुलै १९७६


१) संपादकीय — पाऊले चालली पंढरीची वाट
२) गाठी-भेटी-२० योगिराज श्री. बापुसाहेब मिटकर — सदानंद चेंदवणकर
३) सुख वसे तुझे पायी — श्री. दा. ना. देशमुख
४) तुमचे साईबाबांविषयी सामान्य ज्ञान किती आहे ? — श्री. माधव गोरे
५) युगावतार श्रीसाईबाबा — श्री. चंद्रकांत सामंत
६) श्रीसाईबाबांचा कृपाप्रसाद — श्री. चंद्रकांत सामंत
७) श्री. सप्तश्रृंगी देवी व श्रीसाईबाबा — श्री. मधुकर दीक्षित
८) बाबांची कृपा — श्री. दशरथ तळेकर
९) श्रीबाबांच्या जीवनातील ठळक घटना — —
१०) अगाध—लीला — सौ. सरला सू. गर्जे
११) अमोल भेट — सौ. उषा मुळे
१२) कलियुगात पावणारा देव — श्री. सुरेश सातपुते
१३) माझे बाबा श्रीसाई — श्री. के. रा. धालगांवकर
१४) माझे बाबा — सौ. उषा कर्णिक
१५) श्री दत्ता अवधूता — डॉ. अनिल जायस्वाल
१६) परमेश्वराकडे जाण्याचा सोपा मार्ग — श्री. सदाशिव कुलकर्णी
१७) वाचकांचा पत्रव्यवहार — सौ. निर्मला सावरकर
१८) सुविचार संग्रह — सौ. कलावती चव्हाण


---

श्री चेतन, श्री. कृष्णकुमार खडतरकर, कु. पुष्पलता मोहरे, श्री. वसंत जोशी, सौ. माधुरी कुळकर्णी, श्री. विनायक पाठक, श्री. रमेश चव्हाण, श्री. दत्ताराम बारस्कर, प्रा. गुंडेराव पटवारी, श्री. चकोर आजगावकर, श्री. विजय हजारे, सौ. श्री. शहाणे, श्री. रामनाथ गुरुतुले, श्री जयवंत कुळकर्णी यांच्या भावमधुर कविता.

---

## गुरुपौर्णिमा उत्सव

सालाबादप्रमाणे शिर्डी येथील गुरुपौर्णिमा उत्सव दिनांक १०—११—१२ जुलै हे तीन दिवस साजरा केला जाईल. यंदा दिनांक १० रोजी सायं. ७ ते ९ सौ. माधुरी लघाटे व ९—३० ते ११—३० सौ. माणिक भिडे या गायिकांचे सुश्राव्य गायन होईल. दि. ११ रोजी गायक भक्त रात्रभर हजेरी लावतील. दि. १२ रोजी सुप्रसिद्ध गायक श्री. जयवंत कुलकर्णी व इतर कलाकार यांचा कार्यक्रम सायं. ७ नंतर आयोजित केला आहे. तरी सर्व साईभक्तांनी दर्शनास व कार्यक्रमास हजर राहून सर्वप्रकारचे सहकार्य द्यावे ही संस्थानतर्फे विनंती.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री साई वाक्सुधा

प्राणी भिन्न आत्मा अभिन्न ।
आत्मा कर्तृत्व भोक्तृत्वहीन ।
तो न अशुद्ध पापपुण्याधीन ।
कर्माचरण त्या नाही ॥१०९॥

मी जातीने उच्च ब्राह्मण ।
इतर मजहूनि नीचवर्ण ।
वसे ऐसें जोंवरी भेदज्ञान ।
कर्माचरण आवश्यक ॥११०॥

मी अशरीर सर्वत्र एक ।
मजहूनि कोणी नाही आणिक ।
मीच कीं सकलांचा व्यापक ।
स्वरूपोन्मुख हें ज्ञान ॥१११॥

पूर्णब्रह्म स्वरूपच्युत ।
ऐसा हा जीवात्मा पूर्ववत् ।
कधींतरी स्वस्वरुपाप्रत ।
पावावा निश्चित हें ध्येय ॥११२॥

श्रुति-स्मृति आणि वेदान्त ।
या सर्वांचा हाचि सिद्धान्त ।
हेंचि अंतिम साध्य निश्चित ।
च्युतासि अच्युतपद प्राप्ति ॥११३॥

—श्रीसाईसच्चरित् अध्याय २० वा

# श्रीसाईलीला


[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे
अधिकृत मासिक ]

वर्ष ५५ वे] जुलै ७६ [अंक ४



: संपादक :

श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )



वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.



: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं ८०४-बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ १२ ६१

# संपादकीय —

स. न. वि. वि.

## पाऊले चालली पंढरीची वाट

आषाढ महिना लागला रे लागला की आम्हा हिंदूंचे सण-उत्सव सुरू झाले असे म्हणावयास हरकत नाही. या आषाढ महिन्याचें वर्णन करताना आचार्य अत्रे यांनी " आषाढस्य प्रथम दिवसे " म्हणून मोठी चित्तवेधक सुरुवात केली आहे. या आषाढ महिन्यातली आम्हा भाविकांची सर्वात मोठी पर्वणी म्हणजे आषाढी एकादशी हा सण-उत्सव होय. पांडुरंग हे आम्हा हिंदूंचे, महाराष्ट्र निवासीयांचे मोठे दैवत आहे. पंढरपूर हे त्याचे निवासस्थान. भक्तराज पुंडलिकामुळे आज पंढरपूरला प्रचंड प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. पुंडलिकाच्या मातृपितृ भक्तीमुळे प्रत्यक्ष परब्रह्म प्रसन्न होऊन वैकुंठाहून येथे आले. वैकुंठनगरीचे हे निधान साक्षात पंढरीत आल्यामुळे पंढरीला भूलोकीच्या वैकुंठाचे स्वरूप प्राप्त झाले. पंढरपूर तीर्थक्षेत्र ठरले. आषाढी, कार्तिकी एकादशीला फार मोठी यात्रा भरू लागली. वारकरी आणि भक्तमंडळी लाखोंच्या संख्येने तिथे येऊ लागली आणि श्रीविठ्ठलाचे डोळे भरून दर्शन घेऊ लागली.



**अगा वैकुंठीच्या राया ।**
**अगा विठ्ठल सखया ॥**

ज्या विठ्ठलाच्या केवळ दर्शनाने सुद्धा आपण पावन होतो, त्या विठ्ठलनामाचा महिमा किती श्रेष्ठ आहे ते संत श्रीतुकोबारायांनी आपल्या अभंगवाणीतून कथन केलेलेच आहे.

आपल्या भक्तांसाठी भगवन्त अठ्ठावीस युगापासून पंढरीस विटेवर उभा आहे. संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरांनी या विठ्ठलाचे वर्णन 'रूप पहाता हो लोचनी, सुख झाले वो साजणी ' या अभंगातून अत्युत्तम केले आहे. माऊलीच्या या अभंगाचा मान भजन कीर्तनातून पहिला आहे. तसा दुसरा क्रमांक तुकोबांच्या ' सुंदर ते ध्यान उभे विटेवरी' या ध्यानाच्या अभंगाचा आहे. विठ्ठलाचे रूप माऊलीच्या अभंगाने पहावे तर त्याचे निरंतर ध्यान तुकोबाच्या अभंगाने करावे.

' सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ' या अभंगात श्री तुकोबाराय म्हणतात, अठ्ठावीस युगांपासून भक्तांना दर्शन देण्यासाठी कटीवर कर ठेवून उभ्या असलेल्या या विठ्ठलाची मूर्ती कितीतरी सुंदर आहे, नयनमनोहर आहे. त्याच्या गळ्यात प्रिय अशा तुळशीचा हार असून कमरेचा पितांबर अप्रतिम असा आहे. अशा या सर्वांग सुंदर विठ्ठलाचें

ध्यान निरंतर करण्याचे आम्हाला अतिशय आवडते. त्याच्या कानी मकराकार कुंडले झळकतात. आणि कंठी कौस्तुभमणि शोभायमान होत आहे. अशा या सुंदर, मनोहारी मूर्तीकडे पाहून तुकाराम महाराज आणखीन पुढे म्हणतात, " ज्याच्यात माझी सारी सुखे संपूर्णपणे मावण्याचे समाधान आहे त्या विठ्ठलाचे श्रीमुख मी आवडीने पाहीन. सर्वांग सुंदर अशा विठ्ठलाची विनवणी करताना ते म्हणतात—

सदा माझे डोळा, जडो तुझी मूर्ती
रखुमाईचे पती सोयरीया ॥
गोड तुझे रूप गोड तुझे नाम ।
देई मज प्रेम, सर्वकाळ ॥
विठो माऊलीये हाचि वर देई ।
संचरोनी राही हृदयी माझ्या ॥
तुका म्हणे काही न मागे आणिक ।
तुझे पायी सुख सर्व आहे ॥

तुकाराम महाराजांच्या घराण्यात विठ्ठलभक्ती आणि पंढरीची वारी पूर्वापार चालत आलेली होती. विठ्ठल हे महाराजांचे आवडते असे कुलदैवत असल्यामुळे त्यांची विठ्ठलभक्ती ही अत्यंत तेजस्वी अशी होती. त्यांनी जनतेला विठ्ठलभक्तीचा कीर्तनाद्वारे अखंड उपदेश केला. विठ्ठल भजनी ते देहभान विसरून जात. त्यांनी विठ्ठलाजवळ "अंतरी अखंड संचरोनी राही माझ्या " असा वर मागितला. देवाच्या पायी सर्व सुखे सामावलेली आहेत अशी त्यांची निश्चित खात्री होती. आपले सारे जीवन असे विठ्ठलमय झालेले आहे त्याचे वर्णन " विठ्ठल आमचे जीवन ' या अभंगात त्यांनी केले आहे. त्यात ते म्हणतात,

'विठ्ठल हेच आमचे जीवन आहे. सर्व सिद्धी प्राप्त करून देणारे साधन विठ्ठलच आहे म्हणून विठ्ठल मूर्तीचे ध्यान हा माझा विसावा आहे; इतकेच नव्हे तर माझे वित्त, गाव, चित्त सर्व काही विठ्ठलाचे ठिकाणी मी पहातो. तो माझ्या जिवीचा जिव्हाळा, कृपेचा कोवळा, आणि प्रेमाचा पुतळा आहे. "

ज्याची अशी विठ्ठलमय अवस्था झालेली आहे, जे विठ्ठल ध्यानी तल्लीन, तन्मय झाले आहेत, ते तुकोबाराय विठ्ठलमहिमा पटवून देताना म्हणतात, 'तुम्ही सर्व वाणीने विठ्ठल विठ्ठल म्हणा, विठ्ठल नामाचा जप करा, कारण तो मंत्र सोपा असून सर्व पापांचा नाश करणारा आहे. तेव्हा आपल्या सर्व सुखांसाठी त्या विठ्ठलनामाचा छंद तुम्ही अवश्य लावून घ्या. म्हणून ते तळमळीने सर्वांना सांगतात की—

विठ्ठल टाळ, विठ्ठल दिंडी ।
विठ्ठल तोंडी उच्चारा ॥

विठ्ठल अवघा भांडार ।
विठ्ठल बोला विठ्ठल ॥
विठ्ठल मुखा विठ्ठल दुःखा ।
तुकया मुखा विठ्ठल विठ्ठल ।

या विठ्ठलनामाचा महिमा जनमानसावर ठिंबविण्यासाठी ते म्हणतात—
विठ्ठल चित्ती गावा, विठ्ठल चित्ती ध्यावा
विठ्ठल उभा पहावा, विटेवरी ।

असा अनाथांचा नाथ आणि कृपेचा सागर अशा विठ्ठलाला तुम्ही अनन्यभावे शरण जा म्हणजे तो तुम्हाला मोक्षाला नेईल. खरोखर या विठ्ठल नामाची गोडी अवीट आहे. ज्याच्या मुखी विठ्ठलाचे नाव नेहमी असते त्याच्या अंगी किती सामर्थ्य निर्माण होते ते सांगताना तुकोबाराय म्हणतात—

"अहो, ज्याच्या मुखी विठ्ठलाचे नाम आहे, त्याच्या नुसत्या दर्शनाने पतित पावन होतात. म्हणजेच पतितांचा उद्धार होतो. तुम्ही सर्वांनी आपल्या वाणीने व भक्तीयुक्त अंतःकरणाने विठ्ठलाचे नाम घ्या. त्यामुळे तुम्हास प्रत्यक्ष काळाचाही संपूर्ण पराभव करण्याचे सामर्थ्य येईल. मला विठ्ठलनामाचे सामर्थ्य पटले म्हणूनच की काय मी त्या विठ्ठलाला माझ्या अंतःकरणात अखंड ठेवलेले आहे. विठ्ठलनामावर विश्वास ठेवा आणि स्वोद्धार साधा विठ्ठलनामाचा महिमा पटविण्यासाठी सर्वश्रेष्ठ अशा वेदांचा आधार घेऊन त्यांनी सांगितले आहे—

वेद अनंत बोलिला, अर्थ इतुकाचि साधिला ॥
विठोबासी शरण जावे, निजनिष्ठा नाम घ्यावे ॥

बहुतेक सर्व संतांनी गुणगौरव केलेल्या अशा या विठ्ठलाच्या, पांडुरंगाच्या, रखुमाईवराच्या दर्शनासाठी आता एव्हाना महाराष्ट्रातील ठिकठिकाणाहून पालख्या निघालेल्या आहेत. भक्त-वारकरी मंडळी त्यासोबत आहेत. आणखीन चारसहा दिवसांनी दिंडया-पताका चंद्रभागेच्या वाळवंटात जिकडे तिकडे दिसू लागतील आणि विठ्ठलनामाच्या गजराने अवघी पंढरी दुमदुमून जाईल.

संतश्रेष्ठ भगवान श्री साईबाबा सुद्धा विठ्ठलाचे भक्त होते. पांडुरंगाचा अगाध महिमा त्यांना चांगलाच माहीत होता. आपले एक परमभक्त दासगणू महाराज यांना पंढरपूरला जाण्याची अतीव इच्छा झाली व ती त्यांनी श्रीबाबांना बोलून दाखविली. आपल्या भक्तांच्या इच्छा, कामना पूर्ण करणे हेच संतांचे काम आणि म्हणूनच की काय, बाबांनी दासगणूना तिथल्या तिथे पांडुरंगाचे दर्शन घडविले. तेव्हा संत श्रीदासगणूंना प्रिय असलेल्या श्रीसाईबाबांना त्याहूनही प्रिय असलेल्या श्रीविठ्ठलाचे आपणही आषाढी एकादशी निमित्त पुण्यस्मरण करू या.

## अतींद्रिय योगीराज

# श्री बापूसाहेब मिटकर

• सदानंद चेंदवणकर
राधा-माधव, १२०/४०५५ टिळकनगर;
चेंबूर, मुंबई ८९.

सध्या पुण्यात निवास करून असलेले अतींद्रीय योगीराज श्री. बापूसाहेब मिटकर आमच्या महाराष्ट्राचे मोठे वैभव आहे. ते महान दत्तभक्त असून एक सिद्ध पुरुष आहेत. त्यांना जन्मजात दिव्यदृष्टी, दिव्यश्रुती व वाचासिद्धी प्राप्त झालेली आहे. अनेक देह-धारित्व, त्रिकालज्ञान इ. पातंजल मुनींच्या पातंजल योगात उल्लेखलेल्या विविध



श्री. बापूसाहेब मिटकर

सामर्थ्याने मिटकर महाराज भूषित आहेत. आपले सद्‌गुरु श्री. सयाजीनाथ माळीबुवा उर्फ माळी महाराज तसेच दत्तात्रेयांची सतत व अखंड उपासना व अनेक वर्षांचे पंचप्राण पणाला लावून केलेले अखंड प्रयोग याला ते आपल्या दिव्यशक्ति सामर्थ्याचे सारे श्रेय देतात. त्यांनी आपले संपूर्ण जीवन निसर्गाची गूढ रहस्ये व शक्ती जाणण्यासाठी वाहून घेतले आहे.

श्री. मिटकर महाराजांचे संपूर्ण नाव श्री. मोतीराम बसंतराव मिटकर. त्यांचे मूळगाव कुलाबा जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील भाताण हे होय. परंतु त्यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यातील चिरनेर या गावी ता. १४ जानेवारी १९११ रोजी झाला. हा दिवस आळंदीचे महान योगी श्रीमद नरसिंह सरस्वती यांचा समाधी दिन म्हणून ओळखला जातो. बापूसाहेबांचे वडील या स्वामींचे परमभक्त होते. जन्मानंतर बापूसाहेबांचे सारे आयुष्य पुण्यात गेले आहे.

श्री. बापूसाहेबांच्या वयाच्या चौथ्या वर्षी इ. सन १९१४ मध्ये पुण्यात प्लेगचा प्रादुर्भाव झाला. त्यावेळी आपल्या आईवडीलांसमवेत ते फर्ग्युसन कॉलेज जवळील रामनारायणाचे बंगल्या शेजारी एका झोपडीत रहात होते. येथे एका रात्री किशोर बापूरावांच्या पांघरूणात एक नाग आला. त्याने त्यांना तीन वेळा बाजूला केले व अखेर त्यांच्या गालावर तीनदा फणीने थपडा मारून तो निघून गेला. हा आपल्या जीवनातील एक सर्वात मोठा सुयोग होय असे बापूसाहेब समजतात.

बापूरावांचे प्राथमिक व दुय्यम शिक्षण पुण्यास झाले. इंग्रजी तीन इयत्तापर्यंतचे नूतन मराठीत व इंग्रजी सातवीपर्यंत न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते होते. १९१८ साली त्यांच्या जीवनातील सर्वात मोठी घटना घडली. त्यावर्षी श्रीसमर्थ माळी बाबांची व त्यांची भेट झाली व त्यांनी नामस्मरणादिकांच्या मार्गाने छोट्या बापूंना अध्यात्माच्या मार्गावर आणले. त्यावेळी त्यांचे वय अवघे सात वर्षांचे होते.

बापूसाहेब लहानपणापासूनच दत्तभक्त होते. १९२८ साली हिऱ्याप्रमाणे डोळे असलेल्या व लांब जटा असलेल्या एका साधूचे त्यांना दर्शन झाले. त्यांनीच आपल्याला आजची दिव्यदृष्टी दिली असे बापूसाहेब समजतात. पण तो साधू कोण याचा थांगपत्ता त्यांना लागलेला नाही. या दिव्य दृष्टीमुळेच की काय वडीलांची हरवलेली विमा पॉलिसी त्यांनी लगेच शोधून काढली. आपल्या आईला भोपळा चिरण्याआधीच तो कडू असल्याचे सांगितले. श्रीमंत प्रताप शेटजी गिरजी यांच्या पत्नी चंपाबाई यांचे हरवलेले हिऱ्याचे कर्णभूषण त्यांनी तत्काल शोधून काढले.

श्री. बापूसाहेब मिटकर मॅट्रीकच्या वर्गात असताना ता. ९ जून १९३० रोजी त्यांच्या वडिलांचे पक्षाघाताच्या विकाराने देहावसान झाले. त्यावेळी घरात मातोश्री, दोन लहान भाऊ, तीन बहिणी ही मंडळी होती. अर्थातच त्यांच्या पालनपोषणाची सारी जबाबदारी बापूसाहेबांवर येऊन पडली व ती पार पाडण्यासाठी त्यांनी

शिक्षणाला रामराम ठोकला व ते ओरिएंटल लाइफ इन्शुरन्स कंपनीचे पुण्यातील चीफ एजंट श्री. कावसजी जमशेटजी यांचेकडे लष्करात २५ रु. पगारावर नोकरीस राहिले. पण या एवढया पगारात त्या सर्वांचे भागेना म्हणून जमाखर्च, स्टोव्ह दुरुस्ती, फोनो दुरुस्ती, फोटोग्राफी, फ्रेम मेकींग, सायकल दुरुस्ती, चित्रकला इ. आपल्या वडिलांच्यापासून प्राप्त केलेल्या विद्यांचा उपयोग आपल्या चरितार्थाच्या जोडीसाठी म्हणून केला. याशिवाय बापूसाहेबांनी पिक्चर एनलार्जिंग, पेंटिंग, दिलरुबा, सतार यांचे वादन, गायन इ. कला हस्तगत केल्या व रमल, हस्त सामुद्रिक व कुंडली विज्ञान यांचाही अभ्यास केला. बापूसाहेबांना वैद्यक शास्त्राचीही सूक्ष्म माहिती आहे. वनस्पतींचे काढे, चूर्णे कशी काढावीत, त्यासाठी भट्टया कशा लावाव्यात याचे तर यांना बारीक ज्ञान आहे. कर्क रोगासारखे महाभयंकर रोगही बापूसाहेब उर्फ बाबांनी संपूर्णपणे बरे केले आहेत.

१९३१ साली बाबांचे सद्‌गुरू श्री माळीबाबा व १९३७ त त्यांच्या मातोश्री यांचे निर्वाण झाले. बापूसाहेबांचा विवाह १९४५ त ठाण्याचे श्री. पोतदार यांची कन्या कु. सीता इच्याबरोबर झाला. विवाहानंतर कु. सीता या सौ. शालिनीबाई म्हणून बापूसाहेबांच्या घरात वावरू लागल्या. बापूसाहेबांना त्यांचेपासून कु. कुमुद (सौ. नार्वेकर) ही कन्या व श्री. श्रीपाद अशी अपत्ये लाभली आहेत.

१९४५ सालापासून बाबांची प्रसिद्धी, दिव्यदृष्टी व दूरदर्शन या दोन गोष्टींमुळे जगभर झाली. देशातील व परदेशातील अनेक नियतकालिकातून त्यांचेवर गौरव-पर लेख प्रसिद्ध झाले. एका राजघराण्यातील व्यक्तीनेतर त्यांना तहहयात पेन्शन देऊ केले. पण बाबांनी कुणाच्याही पै पैशाचा स्वीकार त्यावेळीच नव्हे तर अजूनही केला नाही. बाबांनी ॐकार, गायत्री, विविधमंत्र, जपजाप्य, आचरण, ध्यान, मनन, चिंतन, नवविधा भक्ती इ. आत्मसात केल्या आहेत. आपण उपासना सतत करीत रहावी. त्यांचे परिणाम मनावर व देहावर आपोआप होऊन आपल्या देहाभोवती ईश्वरीशक्तिचे वलय तयार होते असे श्री. बाबांचे सांगणे आहे. चांगली चाळीस वर्षे नोकरी करून बाबा आपल्या पात्रतेनुसार त्याकाळी १३०० रु. पगारापर्यन्त चढत गेले ही सांगण्यासारखी गोष्ट आहे. १९७१ साली ते नोकरीतून निवृत्त झाले व त्यानंतर त्यांना ध्यान-मनन-चिंतन करण्यास भरपूर वेळ मिळू लागला.

श्री. बाबांचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा हे आहे. १९६३ सालापासून तो आजतागायत दर महिन्याच्या अमावास्येनंतर येणाऱ्या पहिल्या शनिवारी ते जेजुरीस जातात. बाबा आज सर्व सिद्धीला पोचलेले सद्‌गुरू आहेत. त्यांच्या हातून जे चमत्कार किंवा घटना गुरुकृपेने झाल्या त्या श्रीअक्कलकोट स्वामी, श्रीमाणिकप्रभू, श्रीसाईबाबा, श्रीसाटम महाराज, श्री गजानन महाराज शेगाव यांनी केलेल्या किंवा